स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

अंतर्गत

कला विद्याशाखेच्या मराठी विषयातील (विद्यावाचस्पती)
संशोधनाकरिता सादर केल्या जाणा-या संशोधन प्रबंधाची रूपरेषा

"मराठी कवितेतील छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्रण : एक अभ्यास"

संशोधक

प्रा. श्रीराम त्र्यंबकराव शिंदे

सहाय्यक प्राध्यापक,
मराठी विभाग,
शिवाजी महाविद्यालय, मुरूड
ता. जि. लातूर

मार्गदर्शक

प्रा.डॉ. दुष्यंत मनोहर कटारे

सहयोगी प्राध्यापक,
मराठी विभाग,
कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव
ता. जि. लातूर.

ऑक्टोबर २०१९

"मराठी कवितेतील छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्रण : एक अभ्यास"

भूमिका :

कथा, कविता, कादंबरी, निबंध, नाटक, स्फुट, वैचारिक गद्य इत्यादीने मराठी साहित्याला समृद्धी आली आहे. मराठी वाङ्‌मयाचा पहिला आविष्कार प्रामुख्याने काव्याने झाला असे म्हणता येईल. पुढे पाश्चात्य वाङ्‌मयाच्या संपर्काने अनेक प्रवाह निर्माण झाले. वाङ्‌मयाच्या या सर्व प्रकारातील मला आवडणारा प्रकार म्हणजे कविता. आजपर्यंत मराठी कवितेच्या इतिहासात अनेक महापुरूषांची चरित्रे आलेली आहेत. यापैकी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरही चरित्रात्मक स्वरूपाची कविता मध्ययुगीन कालखंडात मोठ्या प्रमाणावर आली. तशीच तिची काही रूपे आधुनिक कालखंडातही पहावयास मिळतात. माझ्या काव्यवाचनाच्या आवडीमुळे यापैकी छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र वर्णन करणारी कविता माझ्या वाचनात आली व या कवितेकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोन बदलला. मध्ययुगीन व आधुनिक कालखंडातील या कवितेच्या वाचनामुळे या विषयाकडे मी आकर्षित झालो. यातूनच या विषयाच्या संशोधनाची आवड माझ्या मनात निर्माण झाली.

छत्रपती शिवाजी महाराज एक आदर्श महापुरूष, लोककल्याणकारी जाणता राजा. त्यांचे जीवन साहित्यिकांसाठी व तमाम मराठी माणसांसाठी प्रेरणादायी राहिले आहे. या लोकप्रिय पुरूषोत्तमावर केवळ मराठीतच नव्हे तर भारतातील इतर भाषा आणि परकीय भाषा यामध्ये विपुल ग्रंथसंपदा आजवर निर्माण झालेली आहे आणि आजही होत आहे. केवळ मराठी भाषेमध्ये शिवाजी महाराजांवर लहान मोठे मिळून दोन हजारांपेक्षा जास्त ग्रंथ निर्माण झाले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या चरित्रनायकाच्या चरित्राचा शोध मराठी साहित्यातील कवितेतून घेण्याच्या हेतूने मी या संशोधनाकडे वळलो आहे. त्यांचे चरित्र स्फुर्तीदायक असल्यामुळे त्यावर अभ्यास होणे मला गरजेचे वाटते. सर्व धर्माप्रती सहिष्णुतेची भूमिका असणारा, मानवतावादी राजा म्हणून कवितेतून जे त्यांचे चित्र उभे केले आहे त्याचा शोध

घेण्यासाठी मी या विषयाची निवड केली. या विषयाच्या संदर्भात मी आदरणीय गुरूवर्य प्रा. डॉ. दुष्यंत मनोहर कटारे सरांना भेटलो. त्यांच्याशी या विषयासंदर्भात चर्चा करून त्यांनी मान्यता दिली. त्यामुळे मी, "मराठी कवितेतील छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्रण : एक अभ्यास" या विषय निवडला. या संशोधनाच्या निमित्ताने मराठी कवितेतील छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्रण किती यथार्थ झाले आहे याचा अभ्यास करता येईल.

संशोधन विषयाची उद्दिष्टे :

१) मराठी काव्यातून व्यक्त होणारा शिवाजी महाराजांचा काव्यमय इतिहास जाणून घेणे.

२) मराठी कवितेतील छत्रपती शिवाजी महाराजांचे स्थान स्पष्ट करणे.

३) काव्यातून व्यक्त होणारे शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष नोंदवणे.

४) छत्रपती शिवाजी महाराजांवरील कवितेतून व्यक्त होणा-या भाषाशैलीचा अभ्यास करणे.

५) मध्ययुगीन व आधुनिक कवींनी व्यक्त केलेल्या शिवाजी महाराजांच्या व्यक्तिरेखेचा अभ्यास करणे.

६) छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्राचा शोध घेणे.

७) शिवरायांची सर्वधर्मसहिष्णूतेची न्याय्य बाजू वाचकांसमोर आणणे.

संशोधन पद्धती :

मी निवडलेल्या विषयाचा साकल्याने अभ्यास करण्यासाठी कांही संशोधन पद्धतीचा आधार घेणार आहे. त्यात चरित्रात्मक, ऐतिहासिक पद्धतीचा अवलंब करून माझा शोधप्रबंध पूर्ण करणार आहे. प्रत्यक्ष शोध प्रबंध लिहित असताना प्रकरणे, उपप्रकरणे सोयीनुसार पाडून शेवटी निष्कर्ष नोंदवणार आहे.

संशोधन विषयाची प्रकरणनिहाय रूपरेषा :

- प्रस्तावना -

प्रकरण पहिले	:	मराठी कविता : संकल्पना, स्वरूप व वाटचाल
प्रकरण दुसरे	:	मराठी साहित्यातून आलेल्या महापुरूषांच्या चरित्राचा आढावा
प्रकरण तिसरे	:	मध्ययुगीन काव्यातील छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्रण
प्रकरण चौथे	:	आधुनिक काव्यातील छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्रण
प्रकरण पाचवे	:	नवकाव्यातील शिवाजी महाराजांचे चित्रण
प्रकरण सहावे	:	मराठी कवितेतील छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्राचा शोध
प्रकरण सातवे	:	निष्कर्ष

- परिशिष्ट -
- संदर्भसूची -

प्रस्तावना :

मराठी वाङ्मयात कवितेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आजपर्यंत मराठी कवितेत जी अनेक महापुरूषांची चरित्रे आलेली आहेत त्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. अलेक्झांडर, नेपोलियन, हिटलर अशा महान योद्ध्यांच्या मालिकेत छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेतले जाते. सुमारे ३५० वर्षे गुलामगिरीच्या अंधारात चाचपडणा-या हिंदूंना स्वातंत्र्याचा प्रकाश शिवरायांनी दाखविला. तीव्र बुद्धीमत्ता व स्वराज्य स्थापनेची महत्त्वाकांक्षा, असामान्य धैर्य, सदैव जागरूक वृत्ती, अव्वल दर्जाची मुत्सद्देगिरी, सर्व धर्माविषयीचा आदर, सेवकांच्या गुणांची जाणीव, वृत्तीची उदारता, कडक शिस्त, सहका-यांबद्दल प्रेम व न्यायावर आधारलेली राज्यव्यवस्था अशा राजांच्या गुणांचा आदर्श आजही सर्वांना प्रेरणा देणारा आहे. स्त्रियांना आणि सर्व जाती-धर्मातील लोकांना त्यांनी सन्मानाची

वागणूक दिली. उदात्त चारित्र्य आणि परधर्मसहिष्णुता यांचे धडे शिवाजी महाराजांनी दिले. हजारो भारतीयांना स्वाभीमानाचे व स्वराज्याचे बाळकडू राजांनी पाजले.

संत तुकाराम, महात्मा फुले, समर्थ रामदास, शाहिर आगिनदास, शाहिर तुळशीदास, म. मो. कुंटे, स्वातंत्र्यवीर सावरकर, कवी यशवंत, कवी कुसुमाग्रज, ग. दि. माडगुळकर यांच्या साहित्यातून शिवरायांचा इतिहास आला आहे. मराठी साहित्यात छत्रपती शिवाजी महाराजावर बरेच संशोधन आलेले आहे पण कवितेतून फारसे संशोधन झाले नाही. कवितेतून व्यक्त होणारे शिवाजी महाराजांची विविध रूपे संशोधनाच्या माध्यमातून आविष्कृत झाले पाहिजेत. त्या दृष्टीने मी हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

प्रकरण पहिले - मराठी कविता : संकल्पना, स्वरूप व वाटचाल :

प्रस्तुत प्रकरणात कविता म्हणजे काय? कवितेची संकल्पना, कवितेचा इतिहास व वाटचाल, कालखंड कवितेतील वेगवेगळे प्रवाह या घटकाच्या आधारे कवितेचे स्वरूप स्पष्ट करणार आहे.

प्रकरण दुसरे - मराठी साहित्यातून आलेल्या महापुरूषांच्या चरित्राचा आढावा :

कथा, नाटक, कादंबरी, निबंध या वाङ्मय प्रकारातून आलेल्या महापुरूषांच्या चरित्राचा थोडक्यात आढावा या प्रकरणात घेणार आहे.

प्रकरण तिसरे - मध्ययुगीन काव्यातील छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्रण :

संत तुकाराम, रामदास स्वामी, शाहिरी कवींच्या रचना, शाहिर अगीनदास व तुळशीदासांचा पोवाडा इत्यादी मध्ययुगीन काव्यातून आविष्कृत झालेले शिवाजी महाराजांचे चरित्र चित्रण यांचा अभ्यास या प्रकरणात करणार आहे.

प्रकरण चौथे - आधुनिक काव्यातील छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्रण :

महात्मा फुले, म. मो. कुंटे, कवी यशवंत, वि. दा. सावरकर, ग. दि. माडगूळकर, कुसुमाग्रज या व इतर आधुनिक कवींच्या काव्यातील शिवाजी महाराजांचे चित्रण याचा अभ्यास या प्रकरणात करणार आहे.

प्रकरण पाचवे - नवकाव्यातील शिवाजी महाराजांचे चित्रण :

या प्रकरणात विं. दा. करंदीकर, शांता शेळके या व इतर नवकवींनी शिवाजी महाराजांचे केलेले चित्रण याचा शोध मी या प्रकरणात घेणार आहे.

प्रकरण सहावे - मराठी कवितेतील छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्राचा शोध :

या प्रकरणात एकूणच मराठी कवितेतील आलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्रण कसे वेगळे आणि यथार्थ आहे. एक चरित्रनायक म्हणून व्यक्तिमत्त्वाचे वेगवेगळे विशेष या प्रकरणात नोंदवणार आहे.

प्रकरण सातवे - निष्कर्ष :

वरील सर्व प्रकरणाच्या शेवटी या विषयाच्या संदर्भाने काही महत्त्वपूर्ण निष्कर्ष नोंदवणार आहे.

संदर्भसूची

१)	डॉ. काळे अक्षयकुमार	-	अर्वाचीन मराठी काव्यदर्शन
२)	डॉ. पाटणकर वसंत	-	कविता : संकल्पना, निर्मिती आणि समीक्षा
३)	रवींद्र ठाकूर	-	महात्मा फुले यांची समग्र कविता
४)	डॉ. सुधीर रसाळ	-	कविता आणि प्रतिमा
५)	म. रा. जोशी	-	मध्ययुगीन काव्यप्रकार
६)	डॉ. स्नेहल तावरे	-	छत्रपती शिवाजी महाराजांवरील महाकाव्यरचना
७)	द. भी. कुलकर्णी	-	महाकाव्य स्वरूप आणि समीक्षा
८)	ब. मो. पुरंदरे	-	राजा शिवछत्रपती
९)	कुंटे म. मो.	-	राजा शिवाजी
१०)	यशवंत	-	छत्रपती शिवराय
११)	महात्मा फुले	-	शिवछत्रपतींचा पोवाडा
१२)	समर्थ रामदास	-	आनंदवनभूवन
१३)	संत तुकाराम	-	अभंगवाणी
१४)	कालस्वर	-	शंकर वैद्य
१५)	विशाखा	-	कुसुमाग्रज
१६)	सावरकरांची कविता	-	वि. दा. सावरकर
१७)	वाग्वैजयंती	-	गोविंदाग्रज
१८)	डॉ. बाबासाहेब आंबेडकर (चरित्र)	-	धनंजय कीर
१९)	महानायक	-	विश्वास पाटील
२०)	लीळाचरित्र	-	म्हाइंभट

२१)	ज्ञानेश्वर चरित्र	-	संत नामदेव
२२)	दर्शन	-	शंकर वैद्य
२३)	राजर्षी शाहू महाराज	-	धनंजय कीर
२४)	शिवप्रभुचरित्र (सभासदांची बखर)	-	कृष्णाजी अनंत सभासद
२५)	छावा	-	शिवाजी सावंत

संशोधक

प्रा. श्रीराम त्र्यंबकराव शिंदे

सहाय्यक प्राध्यापक,

मराठी विभाग,

शिवाजी महाविद्यालय, मुरूड

ता. जि. लातूर

मार्गदर्शक

प्रा.डॉ. दुष्यंत मनोहर कटारे

सहयोगी प्राध्यापक,

मराठी विभाग,

कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय,

बाभळगाव

ता. जि. लातूर.